# प्रकरण चौथे

# प्रकरण चौथे

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : लोकसहभाग आणि प्रभाव

# (Sant Gadagebaba Gram Swachhata Abhiyan : People's Participation and Impact)

**प्रस्तावना : (Introduction)**

प्रस्तुत प्रकरणात शेळकेवाडी आणि कोरेगाव या गावातील निवडलेल्या नमुन्यातील २०० उत्तरदात्या महिलांकडून मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा सहभाग व अभियानाचा महिलांवरील प्रभाव तसेच ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

सदर प्रकरणात तीन विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या विभागात उत्तरदात्या महिलांच्या सामाजिक पार्श्वभूमीचे विवेचन सादर केले आहे.

दुसऱ्या विभागात दोन्ही गावातील उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा (स्त्री व पुरुष यांचा) ग्रामस्वच्छता अभियानातील सहभाग कितपत होता याचे विश्लेषण केले आहे.

तिसऱ्या विभागात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील तसेच ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव याविषयीचे विवेचन केले आहे.

प्रारंभी आपण अभ्यासाठी निवडलेल्या उत्तरदात्या महिलांची सामाजिक पार्श्वभूमी जाणून घेऊ.

# विभाग-१

## उत्तरदात्यांची व्यक्तिगत आणि कौटुंबिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना**

मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने शेळकेवाडीतील १५ आणि कोरेगाव मधील १८५ अशा एकूण २०० उत्तरदात्यांचे वय, वैवाहिक दर्जा, धर्म, जात, शिक्षण, कुटुंबाचा प्रकार, व्यवसाय, कुटुंबाचा आकार इत्यादीबाबत माहिती संकलित करण्यात आली होती. सदर माहितीचे वर्गीकरण आणि विश्लेषण करून उत्तरदात्यांच्या व्यक्तिगत व कौटुंबिक पार्श्वभूमीचे वर्णन या विभागात करण्यात आले आहे.

**वय (Age)**

उत्तरदात्यांचे त्यांच्या वयोगटानुसार वर्गीकरण सारणी क्रमांक १ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.१**

**उत्तरदात्याचे वयोगटानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | वयोगट | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | २१ वर्षाखालील | ००(०,०)<br>(००) | ३(१००)<br>(१.६२) | ३(१००)<br>(१.५२) |
| २ | २१ ते ३० वर्ष | ५(९.४०)<br>(३३.३३) | ४८(९०.६०)<br>(२५.९५) | ५३(१००)<br>(२६.५) |
| ३ | ३१ ते ४० वर्ष | ४(५.८०)<br>(२६.६७) | ३८(९४.२०)<br>(३५.१४) | ६९(१००)<br>(३४.५) |
| ४ | ४१ ते ५० वर्ष | ४(९.५२)<br>(२६.६७) | ३८(९०.४८)<br>(२०.५४) | ४२(१००)<br>(२१.०) |
| ५ | ५१ ते ६० वर्ष | १(४.००)<br>(६.६७) | २४(९६.००)<br>(१२.९७) | २५(१००)<br>(१२.५) |
| ६ | ६१ ते ७० वर्ष | १५(७.५)<br>(१००) | १८५(९२.५)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |
| एकूण | | १(१२.५०)<br>(६.६७) | ७(८७.५०)<br>(३.७८) | ८(१००)<br>(४.०) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.१ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, एकूण २०० उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (६९ किंवा ३४.५ टक्के) उत्तरदाते ३१ ते ४० या वयोगटातील आहेत. त्या खालोखाल २१ ते ३० वर्षे (५३ किंवा २६.५ टक्के) आणि ५१ ते ६० (२५ किंवा १२.५ टक्के) या वयोगटातील उत्तरदाते दिसून येतात. निवडलेल्या नमुन्यात २१वर्षाखालील तसेच ६० वर्षाहून अधिक वयाचे उत्तरदाते संख्येने सापेक्षत: कमी (अनुक्रमे १.५ आणि ४.० टक्के) असल्याचे दिसून आले.

शेळकेवाडी या गावातील उत्तरदात्यांच्या वयोगटानुसार वर्गीकरणातून असे दिसून येते की, २१ ते ३० वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक म्हणजे ५ (३३.३३ टक्के) इतकी आहे. त्यापाठोपाठ ३१ ते ४० वर्ष व ४१ ते ५० वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांशी संख्या सारखीच असून त्याचे शेळकेवाडीतील एकूण उत्तरदात्यांशी प्रमाण २६.६७ टक्के आहे. त्यानंतर ५१ ते ६० आणि ६१ ते ७० वर्ष वयोगटातील उत्तरदात्यांचे प्रमाण समान असून ती सर्वात कमी म्हणजे १ इतकी (६.६७ टक्के) आहे.

कोरेगावातील उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (६५ किंवा ३५.१४ टक्के) उत्तरदाते ३१ ते ४० वर्षे या वयोगटातील आहेत तर २१ वर्षे वयाखालील उत्तरदाते सर्वात कमी (३ किंवा १.६२ टक्के) आहेत.

**वैवाहिक दर्जा (Marital Status)**

**उत्तरदात्यांचे त्यांच्या वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.२ मध्ये दिले आहे.**

**सारणी क्र. ४.२**
**उत्तरदात्यांचे वैवाहिक दर्जानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | वैवाहिक दर्जा | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विवाहित | १५(७.५८)<br>(१००) | १८३(९२.४२)<br>(९८.९२) | १९८(१००)<br>(९९.०) |
| २ | अविवाहित | -(००)<br>(००) | १(१००)<br>(०.५४) | १(१००)<br>(०.५) |
| ३ | विधवा | -(००)<br>(००) | १(१००)<br>(०.५४) | १(१००)<br>(०.५) |
| एकूण | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.२ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक (म्हणजे १९८) उत्तरदाते विवाहित महिला आहेत. त्याचे एकूण उत्तरदात्यांशी प्रमाण ९९ टक्के इतके आहे.

शेळकेवाडीतील सर्वच उत्तरदाता विवाहित आहेत तर कोरेगावातील दोन वगळता अन्य सर्व उत्तरदाता विवाहित आहे.

## धर्म (Religion)

उत्तरदात्यांचे त्यांच्या धर्मानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.३ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र.४.३**

**धर्मानुसार उत्तरदात्यांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | धर्म | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | हिंदी | १५(८.२४)<br>(१००) | १६७(९१.७६)<br>(९०.२७) | १८२(१००)<br>(९१.०) |
| २ | जैन | -(००)<br>(००) | ३(१००)<br>(१.६२) | ३(१००)<br>(१.५) |
| ३ | मुस्लिम | -(००)<br>(००) | १५(१००)<br>(८.११) | १५(१००)<br>(७.५) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.३ मध्ये दर्शविलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य उत्तरदात्या (१८२ किंवा ९१ टक्के ) हिंदू आहेत. त्याखालोखाल मुस्लिम (७.५ टक्के) आणि जैन (१.५ टक्के) महिला उत्तरदात्यांचा समावेश नमुन्यात आहे. शेळेवाडीतील सर्वच उत्तरदाते हिंदू आहेत. तर कोरेगावातील बहुतांशी उत्तरदात्या (९०.२७ टक्के) हिंदू आहेत.

## जात प्रवर्ग (Caste - Category)

उत्तरदात्यांचे त्यांच्या जाती-प्रवर्गानुसार (Caste Category) वर्गीकरण सारणी क्र. ४.४ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.४**

**उत्तरदात्यांचे जाती प्रवर्गानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | जात प्रवर्ग | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | खुला प्रवर्ग | १५(११.२८)<br>(१००) | ११८(८८.७२)<br>(६३.७८) | १३३(१००)<br>(६६.५) |
| २ | अनुसूचित जाती | ०(००)<br>(००) | ३४(१००)<br>(१८.३८) | ३४(१००)<br>(१७.०) |
| ३ | अनुसूचित जमाती | ०(००)<br>(००) | १(१००)<br>(०.५४) | १(१००)<br>(०.५) |
| ४ | भटक्या जमाती | ०(००)<br>(००) | ८(१००)<br>(४.३२) | ८(१००)<br>(४.००) |
| ५ | ओबीसी | ०(००)<br>(००) | २४(१००)<br>(१२.९७) | २४(१००)<br>(१२.०) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.४ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये खुला प्रवर्गातील महिलांचे प्रमाण सर्वाधित म्हणजे १३३ (६६.५ टक्के) आहे. त्यानंतर अनुक्रमे अनुसूचित जाती (३४ किंवा १७ टक्के), ओबीसी २४(१२ टक्के), एन्.टी. ८ (४ टक्के) या जाती-प्रवर्गातील महिलांचा नमुन्यात समावेश आहे.

शेळकेवाडीतील सर्वच उत्तरदाते खुल्या प्रवर्गातील आहेत. कोरेगावातील उत्तरदात्यांपैकी सर्वाधिक खुल्या प्रवर्गातील आहेत आणि सर्वात कमी उत्तरदाते अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत.

**शैक्षणिक दर्जा (Educational Status)**

उत्तरदात्यांचे त्यांच्या शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.५ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.५**

**उत्तरदात्यांचे शैक्षणिक दर्जानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | शैक्षणिक पात्रता | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | ४(७.४१)<br>(२६.६७) | ५०(९२.५९)<br>(२७.०३) | ५४(१००)<br>(२७.०) |
| २ | प्राथमिक | ४(१०.८१)<br>(२६.६७) | ३३(८९.१९)<br>(१७.८४) | ३७(१००)<br>(१८.५) |
| ३ | माध्यमिक | ६(७.७९)<br>(४०.००) | ७१(९२.२१)<br>(३८.३८) | ७७(१००)<br>(३७.५) |
| ४ | उच्च माध्यमिक | ०(००)<br>(००) | २७(१००)<br>(१४.५९) | २७(१००)<br>(१३.५) |
| ५ | पदवीधर | १(१००)<br>(६.६७) | ४(८०.०)<br>(२.१६) | ५(१००)<br>(२.५) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शविते.

सारणी क्र. ४.५ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण झालेल्या महिलांचे प्रमाण सर्वात अधिक (७७ किंवा ३८.५ टक्के) आहे. त्यानंतर अशिक्षित महिलांचे प्रमाण ५४ (२७ टक्के) इतके आहे. कोरेगावातील बहुसंख्य उत्तरदाते माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले (७१ किंवा ३८.३८ टक्के) आहेत.

शेळकेवाडीतील बहुसंख्य उत्तरदाते ६ (४०.०० टक्के) माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेले आहेत.

समग्र नमुन्याकडे पहाता, उत्तरदात्यांमध्ये साक्षरांचे प्रमाण (७३.० टक्के) निरक्षरांपेक्षा अधिक असल्याचे दिसते. तसेच उच्च शिक्षणाचे प्रमाण सापेक्षत: कमी (२०.५ टक्के) असल्याचे दिसून येते.

## कुटुंबाचा प्रकार (Family Type)

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.६ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.६**

**उत्तरदात्यांचे कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | कुटुंबाचा प्रकार | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | विभक्त कुटुंब | ७(८.९७)<br>(४६.६७) | ७१(९१.०३)<br>(३८.३८) | ७८(१००)<br>(३९.०) |
| २ | संयुक्त कुटुंब | ८(६.५६)<br>(५३.३३) | ११४(९३.४४)<br>(६१.६२) | १२२(१००)<br>(६१.०) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.६ मध्ये सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, प्रस्तुत अभ्यासातील सर्वाधिक (१२२ किंवा ६१ टक्के) उत्तरदाते संयुक्त कुटुंबातील आहेत. तर उर्वरित उत्तरदाते (७८ किंवा ३९ टक्के) विभक्त कुटुंबातील आहेत.

शेळकेवाडीतील एकूण उत्तरदात्यांपैकी ८ (५३.३३ टक्के) संयुक्त कुटुंबातील तर कोरेगावातील उत्तरदात्यांपैकी १४४ उत्तरदाते (६१.६२ टक्के) संयुक्त कुटुंबातील आहेत. तर उर्वरित उत्तरदाते विभक्त कुटुंबातील आहेत.

## कुटुंबाचा आकार (Size of Family)

उत्तरदात्यांचे त्यांच्या कुटुंबाच्या आकारानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.७ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.७**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबाच्या आकारानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | कुटुंबाचा आकार | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | लहान कुटुंब | १०(१०.०)<br>(६६.६७) | ९०(९०.००)<br>(४८.६५) | १००(१००)<br>(५०.०) |
| २ | मध्यम कुटुंब | ५(६.१०)<br>(३३.३३) | ७७(९३.९०)<br>(४१.६२) | ८२(१००)<br>(४१.०) |
| ३ | मोठे कुटुंब | ०(००)<br>(००) | १८(१००)<br>(९.७३) | १८(१००)<br>(९.०) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

प्रस्तुत अभ्यासात विश्लेषणाच्या सोयीकरीता १ ते ५ सदस्य असणाऱ्या कुटुंबाना "लहान कुटुंब', ६ ते १० सदस्य असणाऱ्या कुटुंबाना "मध्यम कुटुंब', तर ११ ते २१ सदस्यसंख्या असणाऱ्या कुटुंबाना "मोठे कुटुंब' असे मानण्यात आले आहे. त्यानुसार सारणी क्र. ४.७ मध्ये दर्शविलेल्या माहितीवरून निवडलेल्या नमुन्यात लहान आकाराच्या कुटुंबांची पार्श्वभूमी लाभलेले सर्वाधिक १०० (किंवा ५० टक्के) इतके उत्तरदाते असल्याचे दिसून येते. त्यापाठोपाठ मध्यम आकाराच्या कुटुबाची पार्श्वभूमी लाभलेल्या उत्तरदात्यांचा ८२ (किंवा ४१ टक्के) क्रम लागतो. मोठ्या आकाराच्या कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्यांची संख्या कमी (१८) आहे.

शेळकेवाडीतील बहुसंख्य उत्तरदाते लहान कुटुंबातील असून त्यांची संख्या १० (६६.६७ टक्के) आहे. त्याचप्रमाणे कोरेगावातील उत्तरदातेही (९० किंवा ४८.६५ टक्के) लहान कुटुंबातील आहेत.

**व्यवसाय (Occupation)**

उत्तरदात्यांचे त्यांच्या व्यवसायानुसार वर्गीकरण सारणी क्र. ४.८ मध्ये दिले आहे.

**सारणी क्र. ४.८**

**उत्तरदात्यांच्या व्यवसायानुसार वर्गीकरण**

| अ.क्र. | व्यवसाय | शेळकेवाडी | कोरेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | गृहिणी | ३(७.१४)<br>(२०.००) | ३९(९२.८६)<br>(२१.०८) | ४२(१००)<br>(२१.०) |
| २ | गृहिणी व स्वत:ची शेती | ११(८.८०)<br>(७३.३३) | ११४(९१.२०)<br>(६१.६२) | १२५(१००)<br>(६२.५) |
| ३ | गृहिणी व शेतमजुर | -(००)<br>(००) | १५(१००)<br>(८.११) | १५(१००)<br>(७.५) |
| ३ | गृहिणी व स्वयंरोजगार | १(५.५६)<br>(६.६७) | १७(९४.४४)<br>(९.१९) | १८(१००)<br>(९.०) |
| एकूण.. | | १५(७.५०)<br>(१००) | १८५(९२.५०)<br>(१००) | २००(१००)<br>(१००) |

टीप : कंसातील आकडेवारी टक्के वारी दर्शविते.

सारणी क्र. ४.८ मध्ये सादर केलेल्या माहितीनुसार उत्तरदात्यां महिलांमध्ये गृहिणी व स्वत:ची शेती या कामात गुंतलेल्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक १२५ असून त्यांचे एकूण उत्तरदात्याशी ६२.५ टक्के इतके प्रमाण आहे. केवळ घरकाम करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ४२ (किंवा २१ टक्के) इतकी आहे. घर सांभाळून स्वयंरोजगार करणाऱ्या १८ (किंवा ९ टक्के) उत्तरदात्यांचा नमुन्यात समावेश आहे. तर उर्वरित महिला घरकाम करून शेतमजूरी करणाऱ्या गटातील आहेत. त्यांची संख्या १५ आहे.

शेळकेवाडीतील बहुसंख्य महिला या "गृहिणी व स्वत:ची शेती' करणाऱ्या गटातील आहेत. त्यांची संख्या ११ (७३.३३) इतकी आहे. त्याचप्रमाणे कोरंगावातील बहुसंख्य महिला घरकाम व स्वत:ची शेती करणाऱ्या करणाऱ्या आहेत. त्यांची संख्या ११४ (६१.६२ टक्के) इतकी आहे.

## विभाग - २

प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या दोन गावात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात महिलांचा सहभाग कितपत होता याचा अभ्यास करणे हे प्रस्तुत अभ्यासाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. शेळकेवाडी आणि कोरेगाव या दोन गावातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात महिलांचा सहभाग कितपत होता हे अभ्यासण्यासाठी या दोन गावातील एकूण २०० उत्तरदात्या महिलांच्या कुटुंबातील स्त्रियांची संख्या, पुरुषांची संख्या, एकूण कुटुंब सदस्यांची संख्या व त्यांच्यापैकी अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ कार्यक्रमांत किती जणांचा प्रत्यक्ष सहभाग होता. याविषयीची माहिती मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने संकलित केली होती. या माहितीच्या वर्गीकरण आणि विश्लेषणाच्या सहाय्याने प्रस्तुत विभागात शेळकेवाडी, कोरेगाव या दोन गावांतील स्त्री, पुरुष, एकूण सदस्य यांच्या अभियानातील सहभागाविषयीचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

## सारणी क्रमांक ४.९

## गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात शेळकेवाडीत राबविण्यात आलेले उपक्रम आणि त्यातील उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | १५ कुटुंबातील सदस्य | | | सहभागी सदस्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | ग्रामसभा | २ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २६ (६६.६७) | २३ (६०.५३) | ४९ (६३.२४) |
| २ | ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहीम | ३ व ४ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २४ (६१.५४) | २४ (६३.१६) | ४८ (६२.३४) |
| ३ | शोषखड्डयांची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहीम | ५ व ६ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २१ (५३.८५) | १८ (४७.३७) | ३९ (५०.६५) |
| ४ | शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहीम | ७ व ८ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २५ (६४.१) | ३० (७८.९५) | ५५ (७१.४३) |
| ५ | घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहीम | ९ व १० ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २५ (६४.१) | ३५ (९२.११) | ६० (७७.९२) |
| ६ | स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रचार व प्रसिध्दी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची माहिती | ११ व १२ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | १८ (४६.१५) | १९ (५०.०) | ३७ (४८.०५) |
| ७ | शौचालय दुरूस्ती / बांधकाम अभियान मोहीम | १३ व १४ ऑक्टोबर ०६ | ३९ | ३८ | ७७ | १९ (४८.७२) | १६ (४२.११) | ३५ (४५.४५) |
| ८ | पाणी शुध्दता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहीम | १५ व १६ ऑक्टोबर ०६ | ३९ | ३८ | ७७ | २४ (६१.५४) | २६ (६८.४२) | ५० (६४.९४) |
| ९ | वैयक्तिक स्वच्छता जागृती | १७ व १८ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | ३५ (८९.७४) | ३५ (९२.११) | ७० (९०.९१) |
| १० | रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहीम | १९ व २० ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २२ (५६.४१) | २२ (५७.८९) | ४४ (५७.१४) |
| ११ | जनावरे स्वच्छता मोहीम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा | २१ व २२ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २२ (५६.४१) | १५ (३९.४७) | ३७ (४८.०५) |
| १२ | वृक्ष संवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहीम | २३ व २४ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २६ (६६.६७) | २१ (५५.२६) | ४७ (६१.०४) |
| १३ | गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य) निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहीम | २५ व २६ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २३ (५८.९७) | १८ (४७.३७) | ४१ (५३.२५) |
| १४ | सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन रोगनिदान प्रतिबंध मोहीम | २७ व २८ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | ५ (१२.८२) | २६ (६८.४२) | ३१ (४०.२६) |
| १५ | गटारे, सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहीम | २९ व ३० ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | २२ (५६.४१) | २२ (५७.८९) | ४४ (५७.१४) |
| १६ | संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर २००६ | ३९ | ३८ | ७७ | ३५ (८९.७४) | ३२ (८४.२१) | ६७ (८७.०१) |
| | | | | | एकूण | ३७२ | ३८२ | ७५४ |
| | | | | | सरासरी | २३.२५ | (२३.८८) | (४७.१३) |
| | | | | | टक्केवारी | (५९.६१) | (६२.८४) | (६१.२०) |

(टीप : कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शवितात.)

सारणीक्र. ४.९ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, शेळकेवाडीतील निवडलेल्या १५ नमुना कुटुंबातील एकूण सदस्यांमध्ये ३९ पुरुष व ३८ स्त्रिया होत्या. १५ नमुना कुटुंबात एकूण ७७ सदस्य होते. त्यावरून त्यांच्या अभियानातील सहभागाविषयीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतात.

१. शेळकेवाडीत संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील पुरुषांचा सरासरी सहभाग ५९.६१ टक्के इतका होता.

२. शेळकेवाडीत संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील स्त्रियांचा सरासरी सहभाग ६२.८४ टक्के इतका होता.

३. यावरून शेळकेवाडीत राबविण्यातआलेल्या ग्राम स्वच्छता अभियानामध्ये स्त्रियांचा सहभाग पुरुषांपेक्षा ३.२३ इतका अधिक होता असे दिसून आले.

४. शेळकेवाडीतील ग्रामस्वच्छता अभियानात निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा एकूण सरासरी सहभाग ६१.२० टक्के होता.

५. शेळकेवाडीत ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या खालील कार्यक्रमात स्त्रियांचा सरासरी सहभाग पुरुषांपेक्षा अधिक होता.

    १. ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम - (६३.१६ टक्के)

    २. शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम - (७८.९५ टक्के)

    ३. घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम - (९२.११ टक्के)

    ४. स्वच्छताविषयक साहित्य प्रदर्शन व प्रात्यक्षिक - (५०.०० टक्के)

    ५. पाणीशुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम - (६८.४२ टक्के)

    ६. वैयक्तिक स्वच्छता जागृती - (९२.११ टक्के)

७. रस्तेदुरुस्ती, सफाई व श्रमदान मोहिम - (५७.८९ टक्के)

८. सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन रोगनिदान प्रतिबंध मोहिम - (६८.४२ टक्के)

९. गटारे सांडपाणी निर्मुलन सांडपाणी वापर मोहिम - (५७.८९ टक्के)

कार्यक्रम निहाय विचार करता वरील कार्यक्रमात पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांचा सहभाग अधिक असल्याचे दिसून येते.

६. कार्यक्रम निहाय विचार करता असे दिसून येते की, शेळकेवाडीत राबविण्यात आलेल्या अभियानातील खालील कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग स्त्रियांच्या सहभागापेक्षा अधिक होता.

१. ग्रामसभा - (६६.६७ टक्के)

२. शोषखड्ड्याची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहिम (५३.८५ टक्के)

३. शौचालय दुरुस्ती/बांधकाम अभियान मोहिम - (४८.७२ टक्के)

४. जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा- (५६.४१ टक्के)

५. वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहिम - (६६.६७ टक्के)

६. गावात स्लोगन स्पर्धा, निबंध स्पर्धा व्यसनमुक्ती मोहिम - (५८.९७ टक्के)

७. संकल्प दिवस - (८९.७४ टक्के)

## सारणी क्रमांक ४.१०

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात कोरेगावात राबविण्यात आलेले उपक्रम आणि उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुषाचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | १८५ कुटुंबातील सदस्य | | | सहभागी सदस्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | ग्रामसभा | २ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४२५ (७१.६७) | ३०४ (४९.११) | ७२९ (६०.१५) |
| २ | ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहीम | ३ व ४ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४१४ (६९.८१) | ४१२ (६६.५६) | ८२६ (६८.१५) |
| ३ | शोषखड्डयांची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहीम | ५ व ६ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | २६१ (४४.०१) | ६६ (१०.६६) | ३२७ (२६.९८) |
| ४ | शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहीम | ७ व ८ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४०४ (६८.१३) | ३८४ (६२.०४) | ७८८ (६५.०२) |
| ५ | घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहीम | ९ व १० ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४८३ (८१.४५) | ५४६ (८८.२१) | १०२९ (८४.९०) |
| ६ | स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रचार व प्रसिध्दी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची माहिती | ११ व १२ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | २७८ (४६.८८) | १९९ (३२.१५) | ४७७ (३९.३६) |
| ७ | शौचालय दुरूस्ती / बांधकाम अभियान मोहीम | १३ व १४ ऑक्टोबर ०६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ३३९ (५७.१७) | १९८ (३१.९९) | ५३७ (४४.३१) |
| ८ | पाणी शुध्दता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहीम | १५ व १६ ऑक्टोबर ०६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४३३ (७३.०२) | ४४९ (७२.५४) | ८८२ (७२.७७) |
| ९ | वैयक्तिक स्वच्छता जागृती | १७ व १८ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ५७२ (९६.४६) | ५९४ (९५.९६) | ११६६ (९६.२०) |
| १० | रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहीम | १९ व २० ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ४०३ (६७.९६) | ३५२ (५६.८७) | ७५५ (६२.२९) |
| ११ | जनावरे स्वच्छता मोहीम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा | २१ व २२ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | २८० (४७.२२) | १०२ (१६.४८) | ३८२ (३१.५२) |
| १२ | वृक्ष संवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहीम | २३ व २४ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ३०८ (५१.९४) | ३१० (५०.०८) | ६१८ (५०.९९) |
| १३ | गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य) निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहीम | २५ व २६ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | १८७ (३१.५३) | ३६३ (५८.६४) | ५५० (४५.३८) |
| १४ | सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन रोगनिदान प्रतिबंध मोहीम | २७ व २८ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | २० (३.३७) | ८३ (१३.४१) | १०३ (८.४९) |
| १५ | गटारे, सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहीम | २९ व ३० ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ३६८ (६२.०६) | ३६५ (५८.९७) | ७३३ (६०.४८) |
| १६ | संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर २००६ | ५९३ | ६१९ | १२१२ | ५६८ (९५.७८) | ५८६ (९४.६७) | ११५४ (९५.२१) |
| | | | | | एकूण | ५७४३ | ५३१३ | ११०५६ |
| | | | | | सरासरी | ३५८.९४ | ३३२.०६ | ६९१.०० |
| | | | | | टक्केवारी | (५६.७९) | (५०.५४) | (५३.६१) |

(टीप : कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात)

सारणी क्र. ४.१० मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, कोरेगावातील निवडलेल्या १८५ नमुना कुटुंबातील एकूण सदस्यांमध्ये ५९३ पुरुष व ६१९ स्त्रिया असे एकूण १२१२ सदस्य होते. त्यावरून त्यांच्या अभियानातील सहभागाविषयीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतात.

१. कोरेगावातील संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील पुरुषाचा सरासरी सहभाग ५६.७९ टक्के इतका होता.

२. कोरेगावातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील स्त्रियांचा सरासरी सहभाग ५६.७९ टक्के इतका होता.

३. यावरून कोरेगावातील राबविण्यातआलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामध्ये स्त्रियांचा सहभाग पुरुषांपेक्षा ६.२५ इतका अधिक होता असे दिसून आले.

४. कोरेगावात निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा एकूण सरासरी सहभाग ५३.६१ टक्के इतका होता.

५. कोरेगावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या खालील कार्यक्रमात स्त्रियांचा सरासरी सहभाग पुरुषांपेक्षा अधिक होता.

   १. घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम - (८८.२१ टक्के)

   २. गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य) निबंध स्पर्धा व्यसनमुक्ती मोहिम - (५८.६४ टक्के)

   ३. संकल्प दिवस - (९५.७८ टक्के)

६. कार्यक्रम निहाय विचार करता असे दिसून येते की, कोरेगावात राबविण्यात आलेल्या अभियानातील खालील कार्यक्रमात पुरुषाच्या सहभाग स्त्रियांचा सहभागापेक्षा अधिक होता.

१. ग्रामसभा - (७१.६७ टक्के)

२. ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम - (६९.८१ टक्के)

३. शोषखड्ड्याची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहिम - (४४.०१ टक्के)

४. शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम - (६८.१३ टक्के)

५. स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके - (४६.८८ टक्के)

६. शौचालय दुरुस्ती/बांधकाम अभियान मोहिम - (८७.१७ टक्के)

७. पाणी शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम - (७३.२० टक्के)

८. वैयक्तिक स्वच्छता जागृती - (९६.४६ टक्के)

९. रस्ते दुरुस्ती, सफाई व श्रमदान मोहिम - (६७.९६ टक्के)

१०. जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा - (४७.२२ टक्के)

११. वृक्षसंवर्धन परसबाग अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहिम - (५१.९४ टक्के)

१२. गटारे सांडपाणी निर्मुलन सांडपाणी वापर मोहिम - (६२.०६ टक्के)

१३. संकल्प दिवस - (९५.७८ टक्के)

## सारणी क्रमांक ४.११

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावात राबविण्यात आलेले उपक्रम आणि उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुषाचा सहभाग दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | कार्यक्रम | दिनांक | दोन्ही गावातील सदस्य | | | सहभागी सदस्य | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | ग्रामसभा | २ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ४५१ (७१.३६) | ३२७ (४९.७७) | ७७८ (६०.३६) |
| २ | ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहीम | ३ व ४ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ४३८ (६९.३०) | ४३६ (६६.३६) | ८७४ (६७.८०) |
| ३ | शोषखड्डयांची स्वच्छता / बांधकाम जागृती मोहीम | ५ व ६ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | २८२ (४४.६२) | ८४ (१२.७९) | ३६६ (२८.३९) |
| ४ | शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहीम | ७ व ८ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ४२९ (६७.८८) | ४१४ (६३.०१) | ८४३ (६५.४०) |
| ५ | घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहीम | ९ व १० ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ५०८ (८०.३८) | ५८१ (८८.४३) | १०८९ (८४.४८) |
| ६ | स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रचार व प्रसिध्दी याबाबतच्या तांत्रिक इ ाानाबाबतची माहिती | ११ व १२ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | २९६ (४६.८४) | २१८ (३३.१८) | ५१४ (३९.८८) |
| ७ | शौचालय दुरुस्ती / बांधकाम अभियान मोहीम | १३ व १४ ऑक्टोबर ०६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ३५८ (५६.६५) | २१४ (३२.५७) | ५७२ (४४.३८) |
| ८ | पाणी शुध्दता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहीम | १५ व १६ ऑक्टोबर ०६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ४५७ (७२.३१) | ४७५ (७२.३०) | ९३२ (७३.३०) |
| ९ | वैयक्तिक स्वच्छता जागृती | १७ व १८ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ६०७ (९६.०४) | ६२९ (९५.७४) | १२३६ (९५.८९) |
| १० | रस्ते दुरुस्ती, सफाई व श्रमदान मोहीम | १९ व २० ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ४२५ (६७.२५) | ३७४ (५६.९३) | ७९९ (६१.९९) |
| ११ | जनावरे स्वच्छता मोहीम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा | २१ व २२ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ३०२ (४७.७८) | ११७ (१७.८१) | ४१९ (३२.५१) |
| १२ | वृक्ष संवर्धन, परसबाग, अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहीम | २३ व २४ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ३३४ (५२.८५) | ३३१ (५०.३८) | ६६५ (५१.५९) |
| १३ | गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य) निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहीम | २५ व २६ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | २१० (३३.२३) | ३८१ (५७.९९) | ५९१ (४५.८५) |
| १४ | सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन रोगनिदान प्रतिबंध मोहीम | २७ व २८ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | २५ (३.९६) | १०९ (१६.५९) | १३४ (१०.४०) |
| १५ | गटारे, सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहीम | २९ व ३० ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ३९० (६१.७१) | ३८७ (५८.९०) | ७७७ (६०.२८) |
| १६ | संकल्प दिवस | ३१ ऑक्टोबर २००६ | ६३२ | ६५७ | १२८९ | ६०३ (९५.४१) | ६१८ (९४.०६) | १२२१ (९४.७२) |
| | | | | | एकूण | ६११५ | ५६९५ | ११८१० |
| | | | | | सरासरी | ३८२.१९ | ३५५.९४ | ७२८.१३ |
| | | | | | टक्केवारी | (५८.१९) | (५६.६९) | (५७.४१) |

(टीप : कंसातील आकडेवारी टक्केवारी दर्शवितात)

सारणी क्र. ४.११ मध्ये सादर केलेल्या आकडेवारीवरून संत गाडगेबाबा ग्रामस्वचछता अभियान शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील निवडलेल्यानमुना कुटुंबातील सदस्यांचा सहभागावरून असे दिसून येते की,

१. दोन्ही गावातील निवडलेल्या २०० नमुना कुटुंबातील एकूण सदस्यांमध्ये ६३२ पुरुष व ६५७ स्त्रिया असे एकूण १२८९ सदस्य होते. त्यावरून त्यांच्या अभियानातील सहभागाविषयीचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे मांडता येतात.

२) दोन्ही गावातील २०० नमुना कुटुंबातील ग्रामस्वच्छता अभियानातील पुरुषांचा सरासरी सहभाग ५८.१९ टक्के इतका होता.

३) दोन्ही गावातील, २०० नमुना कुटुंबातील संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत स्त्रियांचा सरासरी सहभाग ५६.६९ टक्के इतका होता.

४) यावरून अभियानामध्ये स्त्रियांचा सहभाग पुरुषांपेक्षा सापेक्षतः कमी (६.२९ टक्के) होता असे दिसून आले.

५) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात दोन्ही गावातील निवडलेल्या नमुना कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा एकूण सरासरी सहभाग ५७.४१ टक्के इतका होता.

६) शेळकेवाडी व कोरेगावात ग्रामस्वच्छता अभियानात खालील कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग पुरुषापेक्षा अधिक होता.

   १. घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम - (८८.४३ टक्के)

   २. गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य) निबंध स्पर्धा व्यसनमुक्ती मोहिम - (५७.९९ टक्के)

   ३. सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन रोगनिदान प्रतिबंध मोहिम - (१६.५९ टक्के)

यावरून असे दिसून येते की, ढोबळमानाने जी पारंपरिक कामे स्त्रिया करत आहेत त्या कामांमध्ये स्त्रियांचा सहभाग अधिक असल्याचे दिसून येते.

७) ग्रामस्वच्छता अभियानात दोन्ही गावातील निवडलेल्या २०० कुटुंबातील सदस्यांपैकी खालील कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग स्त्रियांपेक्षा अधिक होता.

१. ग्रामसभा - (७१.३६ टक्के)

२. ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम- (६९.३० टक्के)

३. शोषखड्ड्याची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहिम - (४४.६२ टक्के)

४. शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम - (६७.८८ टक्के)

५. स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके -(४६.८४ टक्के)

६. शौचालय दुरुस्ती/बांधकाम अभियान मोहिम - (५६.६५ टक्के)

७. पाणी शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम - (७२.३१ टक्के)

८. वैयक्तिक स्वच्छता जागृती - (९६.०४ टक्के)

९. रस्ते दुरुस्ती, सफाई व श्रमदान मोहिम - (६७.२५ टक्के)

१०. जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर स्पर्धा - (४७.७८ टक्के)

११. वृक्षसंवर्धन परसबाग अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहिम - (५२.८५ टक्के)

१२. गटारे सांडपाणी निर्मुलन सांडपाणी वापर मोहिम - (६१.७१ टक्के)

१३. संकल्प दिवस - (९५.४१ टक्के)

दोन्ही गावात राबविलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात लोक सहभाग मोठ्या प्रमाणावर होता असेवरील विश्लेषणावरून स्पष्ट होईल. या अभियानाच्याा निमित्ताने स्त्रियाना प्रथमच घराबाहेरील गावातील सार्वजनिक जीवनात सहभागी होता आले आहे. स्त्री-पुरुष यांच्या सहभागाच्या टक्के वारीत फरक असला तरी तो फारसा नाही. त्यामुळे स्त्रियादेखील या अभियानात पुरुषांच्या बरोबरीने सहभागी झाल्या आहेत असेच सर्वसाधारणपणे दिसून येते.

# विभाग - ३

## संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव

अभ्यास पद्धतीसंबंधीचा प्रकरणात यापूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा महिलांवरील प्रभाव अभ्यासणे तसेच या अभियानाचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव तपासणे अशी प्रस्तुत अभ्यासाची दोन प्रमुख उद्दिष्ट्ये होती. या उद्दिष्टांना अभ्यासाची प्रस्तुत विभागात दोन भाग केले आहेत. पहिल्या भागात अ) अभियानाच्या महिलांवरील प्रभावाचे विवेचन केले आहे तर दुसऱ्या ब) भागात अभियानाचा ग्रामीण पर्यावरणावर झालेल्या प्रभावाचे विश्लेषण केले आहे.

# विभाग - ३ (अ)

### संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील प्रभाव :

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील प्रभावाचे विवेचन खालीलप्रमाणे करता येईल.

### १) घर व परिसर स्वच्छता विषयक वाढती जाणीव आणि कृतिशीलता :

स्वत:चे घर व परिसर स्वच्छ राहण्यासाठी आपण अभियानांतर्गत कोणती कामे केली ? असा प्रश्न महिलां उत्तरदात्यांना विचारला असता, शेळकेवाडतील एकूण १५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (११ किंवा ७३.३३ टक्के) उत्तरदात्यांनी आणि कोरेगावातील एकूण १८५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (१८४ किंवा ९९.४६ टक्के) उत्तरदात्यांनी असे सांगितले की, त्या नियमितपणे घर व परिसर स्वच्छ ठेवतात. अंगणात सडा टाकून रांगोळी काढतात. यावरून असे दिसून येते की, स्वच्छता अभियानामुळे महिलांची घर व परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय अधिक बळकट झाली आहे. आता घराच्या आजुबाजूच्या परिसरात ही स्वच्छता दिसून येते. प्रत्येकांच्या घरासमोर तुळस व इतर शोभेची झाडे लावलेली दिसून यतात. घरातील भांडी,कपडे व इतर आवश्यक वस्तू व्यवस्थित ठेवलेल्या दिसून येतात.

लिंगभेदावर आधारीत श्रमविभाजनानुसार, घराची अंतर्गत स्वच्छता, सजावट आणि घराच्या परिसराची स्वच्छता या बाबी स्त्रियांचे काम समजले जाते. त्यानुसार स्त्रिया हे कामकरीत आल्या आहेत. अभियानामुळे याबाबतीतील महिलांची जाणिव अधिक वाढली आहे आणि त्या अधिक कृतीशील बनल्या आहेत असे प्रस्तुत संशोधनावरून दिसून आले आहे.

**२) शौचालय बांधल्यामुळे महिलांची कुचंबणा थांबली आहे :**

शेळकेवाडी व कोरेगावातील सर्वच महिला उत्तरदात्यांनी शौचालये बांधल्यामुळे खूप फायदा झाल्याचे सांगितले, कारण अभियान राबविण्यापूर्वी शौचविधीसाठी महिलांना हागणदारीत शेतामध्ये व इतर ठिकाणी जावे लागत असे. ही गोष्ट त्याना लाजिरवाणी, त्रासदायक व अडचणीची वाटायची. स्वच्छता अभियानामुळे वैयक्तिक व सार्वजनिक शौचालय पुरेशा प्रमाणात गावात बांधल्यामुळे महिलांना येणाऱ्या अडचणी दूर होऊन महिलांना त्याचा सर्वाधिक फायदा झाला. शेळेकवाडीत १०० टक्के घरांना वैयक्तिक शौचालये आहेत. कोरेगावात बहुसंख्य (१७७ किंवा ९५.६८ टक्के) कुटुंबानी वैयक्तिक शौचालये बांधलेली आहेत. वैयक्तिक शौचालय नसणारे उत्तरदाते सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. तसेच शेळकेवाडी व कोरेगावातील उत्तरदात्यांच्या कुटुंबातील स्त्री-पुरुष व मुले शौचालयांचा नियमित वापर करतात, असेही उत्तरदात्यांनी मुलाखतीच्यावेळी सांगितले.

**३) महिलांना होणारा धुराचा त्रास गोबरगॅसमुळे थांबला :**

ग्राम स्वच्छता अभियानामुळे शेळकेवाडीत १०० टक्के वैयक्तिक शौचालये झाले, तसेच सर्वच उत्तरदात्यांकडे जनावरे आहेत. त्यांच्या मलमुत्राचा व शौचालयांचा उपयोग करून स्वयंपाक गॅस तयार करण्यासाठी गोबर गॅस प्लँट उभारले आहेत. कोरेगांवात ९६ टक्के वैयक्तिक शौचालय झाले. कोरेगावातील एकूण उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (१४७ किंवा ७९.४६ टक्के) उत्तरदात्यांकडे जनावरे आहेत. त्यांच्या मलमुत्राचा व वैयक्तिक शौचालयांचा उपयोग करून गोबर गॅस प्लँट उभारले आहेत. गॅसचा वापर स्वयंपाक तयार करण्यासाठी झालेला आहे. हा फार मोठा फायदा महिलांना झालेला आहे. कारण या अगोदर बऱ्याच महिलांना इंधनासाठी लाकूड दूरवर जावून गोळा करून

आणावे लागत असे व पावसाळ्यात ते कोठे ठेवायचे याचीही अडचण होत असे. गोबरगॅस झाल्यामुळे महिलाना धुराचा होणारा त्रास व जळावू लाकूड जमा करण्यासाठी होणारा बराच त्रास कमी झालेला आहे. हेही प्रस्तुत अभ्यासावरून दिसून आले.

**४) परसबागांचा महिलाना झालेला फायदा :**

संत गागडेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत अनेक कुटुंबानी घराच्या सांडपाण्याचा वापर करून परसबागा फुलवलेल्या दिसून येतात. शेळकेवाडीत एकूण १५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (१३ किंवा ८६.६७ टक्के) उत्तरदात्यांकडे परसबागा असल्याचे दिसून येते व कोरेगावात एकूण १८५ उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (१२३ किंवा ६६.४९ टक्के) उत्तरदात्यांकडे परसबागा असल्याचे दिसून येते. परसबागेमध्ये फुलांची झाडे, फळांची झाडे, औषधी वनस्पती व भाजीपाला इ. चा समावेश आहे. त्यामुळे परसबागेचा फायदा केवळ घर व परिसर सुंदर दिसण्यासाठी झालेला नाही तर या परसबागांमधून फुलझाडे, शोभेची इतर झाडे, भाजीपाला, औषधी वनस्पती इ. ची लागवड करण्यात आली आहे. परसबागेतील फुल व भाजीपाला व औषधी वनस्पतींचा फायदा महिला वर्गाना मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

**५) महिलांची कचरा व्यवस्थापनाबाबतची जाणीव वाढली आहे :**

अभियान राबविण्यापूर्वी तुमच्याघरात कचराकुंडी होती काय? सध्या तुमच्या घरात कचराकंडी आहे काय? व सध्या आपल्या घरातील कचऱ्याची विल्हेवाट कशी लावली जाते? घराच्या बाजूबाजूच्या परिसरात कचरा टाकल्यावर दंडात्मक कारवाई केली जाते काय? असे प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारले होते. शेळकेवाडीत अभियानापूर्वी फक्त चारच उत्तरदात्याकडे कचराकुंडी होती. सध्यासर्वच उत्तरदात्यांकडे घरात कचराकुंडी आहे. कोरेगावात अभियानापूर्वी ६७.५७ टक्के उत्तरदात्यांकडे घरात कचराकुंडी होती. सध्या (१६७ किंवा ९०.२७ टक्के) उत्तरदात्यांकडे कचराकुंडी आहे. पूर्वी दोन्ही गावातील अनेक लोक घरातील कचरा आजूबाजूला टाकीत होते. अभियानानंतर शेळकेवाडीतील सर्वच उत्तरदाते घरातील कचऱ्याचा उपयोग आता कंपोस्ट खतासाठी करतात. कोरगावातील बहुसंख्य (१७६) उत्तरदाते घरातील कचऱ्याची विल्हेवाट कंपोस्ट खतासाठी करतात. तेथील ९ उत्तरदाते घरातील कचऱ्यांची विल्हेवाट

नेडॅपसाठी करतात. घराच्या आजूबाजूच्या परिसरात कचरा टाकल्यावर दंडात्मक कारवाई केली जाते असे दोन्ही गावातील उत्तरदात्यानी सांगितले.

यावरून असे दिसून येते की, कचरा व्यवस्थापनाच्या बाबतीत शेळकेवाडी आणि कोरेगाव या दोन्ही गावातील लोक विशेषत: महिलां फारच दक्ष असलेल्या दिसून येतात. गावात घराघरात कचराकुंड्या आहेत. घरातील कचरा प्रथम कचरा कुंडीत व नंतर वैयक्तिक कंपास्ट खड्ड्यात टाकतात व नंतर त्याचा खतासाठी वापर करतात. तसेच घराच्या बाजूबाजूच्या परिसरात कचरा टाकल्यावर दंडात्मक कारवाई होते. या सर्व गोष्टीमुळे गावात सर्वत्र स्वच्छता दिसून येते. कचरा व्यवस्थापनाबाबतची महिलाची जाणीव वाढल्याचे दिसून येते.

**६) बालकांच्या आणि मातांच्या आरोग्याबाबतची महिलांची जाणीव वाढली आहे :**

अभियान काळात माता आणि मुले याच्या आरोग्याबाबतची महिलांमधील जाणीव-जागृती वाढविण्यासाठी खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्र बलशाली बनविण्यासाठी बालक निरोगी राहणे आवश्यक आहे. सदृढ बालकासाठी माता सुरक्षित असणे आवश्यक आहे. मुलांचे आरोग्य मानसिक व शारीरिक वाढ, त्याचा आहार समतोल राखणे हे मातेवर अवलंबून असते. यासाठी गरोदर मातांची तपासणी व बाळाला स्तनपान करण्याचे महत्त्व व बालसंगोपनासाठी माहिती अभियानकाळात देण्यात आली. माता व बालकांच्या आहाराविषयी माहिती देण्यात गावामध्ये अभियान काळात सदृढबालक स्पर्धा घेतल्या व गरोदर मातांची तपासणी केली आणि सर्व रोगनिदान आरोग्य शिबिर घेतले. याचा फार मोठा फायदा महिलांना झाला. तसेच निवडक गावामध्ये प्रसुतीवेळी तज्ञ आया किंवा डॉक्टर यांची मदत घेतली जाते. तुम्ही आपल्या कुटुंबातील लहान मुलाचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी कशी काळजी घेता? असा प्रश्न विचारला होता, दोन्ही गावातील महिला मुलांच्या स्वच्छतेकडे, आहाराकडे (उघड्यावरचे अन्न खाऊ न देणे) व ती आजारी पडू नयेत याची दक्षता घेतात. दोन्ही गावातील स्त्रियां मुलांच्या स्वच्छतेचे आणि आरोग्य व्यवस्थित ठेवण्याच्या बाबतीत तसेच स्वच्छ आंघोळ, केस विंचरणे, स्वच्छ कपडे घालणे, जेवणापूर्वी तसेच शौलायानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, वेळेत नखे कापणे इ. बाबत विशेष लक्ष देतात. मुलांना शाळेतही चांगल्या सवयी लावलेली दिसून येतात. त्याप्रमाणे ते वागतात. त्यामुळे

मुलांचे आरोग्य चांगले व सदृढ राहण्यास मदत होते. मुले आजारी पडत नाहीत असे महिला उत्तरदात्यांनी सांगितले. या सर्व कार्यक्रमामुळे महिलांच्या आरोग्यविषयक ज्ञानात आणि जाणिवेत वाढ झालेली दिसून आली.

**७) स्त्रियांच्या आरोग्यात सुधारणा :**

अभियान राबविण्यापूर्वी दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे घरातील स्त्रिया आजारी पडत होत्या काय? तसेच अभियानानंतर स्त्रियांचे आजारी पडण्याचे प्रमाण कमी झाले आहे का? असे प्रश्न महिला उत्तरदात्यांना विचारले होते. दोन्ही गावातील बहुसंख्य (८० टक्के) उत्तरदात्यांनी अभियान राबविण्यापूर्वी दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे आपल्या घरातील स्त्रिया वारंवार आजारी पडत होत्या असे सांगितले. मात्र अभियानानंतर उत्तरदात्यां महिलांनी साथीचे व पाण्यामुळे उद्भवणारे आजार कमी झाले आहेत असे सांगितले.

**८) महिला मंडळ व बचत गटाचा फायदा :**

अभियान राबविण्यापूर्वी गावात महिला मंडळ व बचतगट होते का? आपण बचतगटाचे सभासद आहात का? बचत गटामुळे स्त्रियांना आर्थिक लाभ व रोजगाराच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत काय? असे प्रश्न उत्तरदात्यांना विचारले होते. दोन्ही गावातील बहुसंख्य उत्तरदात्यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यापूर्वीही बचत गट गावात होते. पण ते केवळ नावालाच होते. त्यांचे मार्फत कोणतेही भरीव कामहोत नव्हते असे सांगितले.

प्रस्तुत अभ्यासाचे वेळी कोरेगावात एकूण ४६ तर शेळकेवाडीत एकूण ६ महिलांचे बचतगट कार्यरत असल्याची माहिती मिळाली. प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या उत्तरदात्यांपैकी शेळकेवाडीतील ८० टक्के उत्तरदाते तर कोरेगावातील ५३.५१ टक्के उत्तरदाते महिला बचतगटांचे सभासद होते. असे प्रस्तुत अभ्यासात दिसून आले. या महिला बचत गटांमुळे महिलांचे सबलीकरण होण्यास चालना मिळाली आहे.

शेळकेवाडीत बचतगटामुळे स्त्रियांना आर्थिक लाभ व रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. त्यात त्यांनी गांडूळ शेती, भाजीपाला केलेला आहे आणि बचतगटामार्फत फोन बॉक्सही बसविला आहे.

कोरेगावातबचत गटामार्फत पिठाची गिरण प्रकल्प, वैरण विकास प्रकल्प उभारणेत आलेला आहे. त्यामुळे महिलांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. कोरेगावात बचतगटात महिला दर महिन्याला काही रक्कम जमा करतात व ती रक्कम बँकेत ठेवतात व ज्यांच्या काही अडचणी असतील त्यांना रक्कम कर्जरुपाने देतात. रक्कम परत घेताना त्या रकमेवर नियमाप्रमाणे व्याज घेतात. यातून जो फायदा मिळतो तो सर्व महिलांना मिळतो. ग्रामीण भागात महिलांना बचतगटामार्फत आर्थिक क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळत आहे. ग्रामस्वच्छता अभियानामुळे महिलांच्या बचत गटाना प्रोत्साहन देण्याची भूमिका दोन्ही गावातील लोकानी घेतली आहे.

**९) अभियानामुळे सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी महिलांना मिळाली आहे :**

चूल व मूल हेच महिलांचे कार्यक्षेत्र आहे अशी पारंपरिक समजूत आहे. ग्रामीण भागात ही धारणा अधिक मोठ्या प्रमाणावर अगदी अलिकडच्या काळापर्यंत दिसून येत होती. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यासाठी व स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी गावातील सर्वांचा सहभाग असणे आणि सर्वांनी एकत्र येऊन सामुहिक पातळीवर कार्यक्रम राबविणे आवश्यक बनले आहे. त्यामुळे गावातील पुरुष मंडळीबरोबरच शाळेतील मुले आणि गावातील महिलांनाही या अभियानात सहभागी करून घेण्यात आलेले आहे. अभियानातील अनेक कार्यक्रमात महिला सहभागी नसतील तर ते कार्यक्रम यशस्वी होण्याची शक्यता कमीच आहे. त्यामुळेच जी गावे ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत स्पर्धेत यशस्वी झाली आहेत त्या गावामध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो.

ग्रामस्वच्छता अभियानामुळे महिलाना चार भिंतीच्या बाहेर पडून गावातील सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे. त्यामुळे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रातील महिलांचा सहभाग वाढण्यास सदर अभियानामुळे चालना मिळाली आहे.

# विभाग ३ (ब)

**स्वच्छता अभियानाचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाद्वारे ग्रामीण परिसर स्वच्छ, सुंदर करण्याबरोबर तेथील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी सर्व प्रकारचे कार्यक्रम राबविले जातात. या अभियानाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव ग्रामीण पर्यावरणावर होतो. ग्रामीण पर्यावरणाचे संवर्धन करणारे महत्त्वपूर्ण प्रभावी साधन म्हणून आपल्याला स्वच्छता अभियानाकडे पाहता येईल.

**अ) ग्रामीण परिसराची स्वच्छता :**

शेळकेवाडी आणि कोरेगाव या दोन गावांमध्ये राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे ग्रामीण पर्यावरणावर कोणता प्रभाव पडला हे जाणून घेण्याचा प्रयत्न करणे हे या अभ्यासाचे एक उद्दिष्ट होते. त्यानुसार अभियानाच्या पर्यावरणावरील प्रभावाचे विवेचन या विभागात करण्यात आले आहे.

**१) रस्ते साफसफाई :**

शेळकेवाडी या गावातील लोक स्वच्छतेच्या बाबतीत अधिक दक्ष आहेत हे दिसून आले. अभियान राबविण्यापूर्वी गावतील रस्त्यांचे स्वरूप चांगले नव्हते. अभियान काळात गावातील सर्व लोक एकत्र येऊन त्यांनी लोकवर्गणी व लोकसहभागातून गावतील रस्ते चांगले केले. रस्त्यामधील खाचखळगे भरून रस्ते दुरुस्त करण्यात आले. त्यामुळे रस्ते चांगले झाले आहेत.

कोरेगावात अभियान राबविण्यापूर्वी या गावातील रस्त्यांच्या कडेला घरातील सर्व केरकचरा काही लोक टाकीत होते. त्यामुळे लोकांना त्याचा त्रास होत असे. अभियान काळात गावातील सर्व लोक एकत्र येऊन त्यानी रस्त्याच्या कडेला असणारी घाण काढली. गावातील रस्त्यांचे डांबरीकरण करून घेतले. त्यामुळे रस्ते स्वच्छ व चांगली बनल्याचे दिसून येते. त्याचा फायदा त्यांना झाल्याचे दिसून आले.

## २) गटारे बांधकाम व सांडपाणी निर्मुलन :

शेळकेवाडीमध्ये एकूण ७८० मीटर लांबीची गटारे बांधण्यात आली आहेत. आता गावात कुठेही दलदल नाही. तसेच सांडपाणी साचून राहील असाएकही खाचखळगा कुठेही दिसत नाही. सांडपाण्यावर परसबागा फुलविल्या आहेत. त्याबरोबर सांडपाणी शुद्धीकरण करून शेतीसाठी त्याचा पुनर्वापर करण्यात आला आहे. गावात ४ ठिकाणी शोषखड्डे आहेत. त्यामुळे गावात सर्वत्र स्वच्छता व परसबागा फुललेल्या दिसून येतात.

कोरेगावात ग्रामस्वच्छता अभियानामुळे घराघरात सांडपाण्याचे नियोजन करण्यास सुरुवात झाली. सांडपाण्याच्या नियोजनामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या कमी झाल्या. अभियानामुळे सांडपाण्याचे व्यवस्थापन अतिशय उत्तर प्रकारे करण्यात आल्याचे दिसते. ४३९ कुटुंबानी सांडपाण्यावर परसबागा तयार केल्या आहेत. सांडपाण्यासाठी गावाबाहेर २० x २० आकाराचा टँक बांधला आहे. हे पाणी शेतीला दिले जाते. ५५ ठिकाणी श्रमदानातून सार्वजनिक व वैयक्तिक शोषखड्डे काढले आहत. गावात एकूण ६००० मीटर लांबीची गटारे बांधली असून ५०० मीटर लांबीची गटारे बंदिस्त स्वरुपात आहेत. आता गावात कुठेही सांडपाणी साचून राहत असल्याचे दिसून येत नाही. या सर्वांचा परिणाम म्हणून घराघरातील आरोग्य चांगले रहाण्यास मदत झाली आहे.

## ३) कचरा निर्मुलन :

शेळकेवाडी या गावात अभियानापूर्वी घरात कचराकुंडी ठेवणाऱ्याचे प्रमाण खूप कमी होते. परंतु अभियानामुळे आता सर्वच घरात कचराकुंडी वापरण्यास सुरुवात झाली आहे. ओला कचरा व सुका कचरा अशी कचऱ्याची वेगवेगळी विभागणी केली जाते. ओला कचरा म्हणजे कुजणाऱ्या वस्तू आणि सुका कचरा म्हणजे न कुजणाऱ्या वस्तू. उदा. काच, रबर, प्लॅस्टिक इत्यादी. तरुण मंडळांच्या कार्यकर्त्यांकडे घंटागाडीतून कचरा नियमित वाहून नेला जातो. गावात १० सार्वजनिक कचराकुंड्या ठेवल्या आहेत. कचरा विल्हेवाटीसाठी ६५ वैयक्तिक कंपोस्ट खड्डे आहेत. कचऱ्याच्या माध्यमातून गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरु आहेत. थोडक्यात या सर्व उपक्रमांमुळे व प्रयत्नामुळे घरात व गावात सर्वत्र स्वच्छता राहण्यास मदत झाली आहे.

अभियानामुळे कोरेगावात लोक स्वच्छतेच्या बाबतीत अधिक जागरुक झाले असल्याचे दिसून आले. गावात ९० टक्के इतक्या घरात कचराकुंडी वापरण्यास सुरुवात झाली. कचऱ्याची ओला व सुका कचरा अशी विभागणी केली जाते. कचरा वाहून नेण्यासाठी ग्रामपंचायतीची घंटागाडी असून ग्रामपंचायत कार्यालयामार्फत नियिमत कचरा गोळा केला जातो. कचऱ्याचा गांडूळखत व नेडॅपमध्ये वापर करून ग्रामपंचायतमार्फत खत निर्मिती केली जाते. ओला व सुका कचरा यासाठी सार्वजनिक ठिकाणी ६७ कचराकुंड्या आहेत. गावात ७ ठिकाणी नेडॅप व ४ ठिकाणी सार्वजनिक गांडूळ खत प्रकल्प उभारण्यात आले आहेत. गावाबाहेर ५०० मीटर अंतरावर २ कंपोस्ट खड्डे तयार केलेले आहेत. गावात प्लॅस्टिक वापरावर बंदी आहे. तसेच आजूबाजूच्या परिसरात कचरा टाकल्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. थोडक्यात या सर्व उपक्रमांमुळे गावात व घरात स्वच्छता राहण्यास मदत झाली आहे.

**४) घर, परिसर, शाळा व सार्वजनिक इमारतींची स्वच्छता :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंमलबजावणीच्या काळात शेळकेवाडी गावातील गल्ल्यांचा परिसर, ग्रामपंचायत कार्यालये, देवालये स्वच्छ केलेली आहेत. तसेच घराघरात स्वच्छता आहे. घरातील भांडी, कपडे व इतर वस्तू व्यवस्थित ठेवलेल्या दिसून येतात. तसेच शाळेसमोरील परिसर स्वच्छ केलेला आहे. तसेच शाळा, घर, सार्वजनिक इमारती ह्या गुलाबी रंगाने रंगविलेल्या आहेत. यामुळे शेळेवाडी गाव, परिसर स्वच्छ व सुंदर दिसून येतो.

कोरेगावात ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत घरांची रस्त्यांची, घरासमोरील अंगणे यांची सजावट व स्वच्छता नियमित ठेवली जाते. परसबागांची निर्मिती व शोभेची झाडे व औषधी वनस्पतींची लागवड केली आहे. अंगणात दररोज सडा मारून रांगोळी काढली जाते. शाळेसाठी बागेची निर्मिती करण्यात आलेली आहे. गावातील शासकीय कार्यालये, ग्रामपंचायत, दवाखाना, प्रा. शाळा व अंगणवाडी यांचे रंगकाम करून स्वच्छता ठेवण्यात आली आहे.

**ब) पाणी व्यवस्थापन :**

**१) शुद्ध पिण्याचे पाणी व आरोग्य :**

पाण्याचे प्रदुषण ही अलीकडे एक गंभीर पर्यावरणीय समस्या बनली आहे. दूषित पाण्याचा वाईट परिणाम मानवी जीवनाबरोबर, पशुपक्षी व शेतीवर देखील होत असतो. शेळकेवाडी गावात शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्याकडे विशेष लक्ष दिले आहे. सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये टी. सी. एल्. पावडर योग्य प्रमाणात वेळेवर नियमित टाकली जाते. अभियान सुरु झाल्यापासून गावात कोणत्याही जलजन्य अथवा अन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही. घरगुती पिण्याचे पाणी उंचावर ठेवले जाते. तोटी किंवा नळ असणारी टाकी पिण्याच्या पाण्यासाठी वापरली जाते. पाणी घेण्यासाठी वगराळाचा वापर केला जातो. त्यामुळे हाताची घाण लागून पाणी दूषित होत नाही.

कोरेगावात पाणी शुद्धीकरणासाठी, प्रती १००० लिटर पाण्यामध्ये ५ ग्रॅम टी. सी. एल्. टाकून पाणी शुद्धीकरण केले जाते. त्याचबरोबर घरातील पिण्याचे पाणी अशुद्ध होऊ नये म्हणून पिण्याचे पाणी उंचावर ठेवणे, त्यास तोटीचा व वगराळाचा वापर करणे इ. यामुळे पिण्याचे पाणी दूषित होत नाही. याशिवाय पाण्याचा वापर काटकसरीने केला जातो. तसेच गावात कोणत्याही जलजन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत पाण्याची रासायनिक तपासणी केली जाते.

**क) पर्यावरण संवर्धन :**

**१) वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन :**

शेळकेवाडी या गावात प्रत्येक कुटुंबाने ५० झाडे या प्रमाणे सर्व कुटुंबानी झाडे लावलेली आहेत. लावलेली सर्व झाडे जतन केलेली आहेत. पर्यावरण संतुलनासाठी गावातील रस्त्यांच्या दुतर्फा, सार्वजनिक इमारती, शाळा, ग्रामपंचायत कार्यालये इ. ठिकाणी वृक्षारोपण केलेले आहे.

कोरेगाव या गावात झाडाचे प्रती कुटुंब ३२ झाडे या प्रमाणे झाडे लागवलेली आहेत. लावलेली झाडे जतन केलेली आहेत. त्यामध्ये गावातील मुख्य रस्त्याच्या दुतर्फा, शाळेच्या आवारामध्ये, ग्रामपंचायत समोरील सार्वजनिक जागेवर १२४५ गोल्डन ड्युरांडा,

३२६ आवळा, ५१४ रातराणी, ५०३ एक्झोरा, १४८ गुंज, ४८९ अंजिर, २०० सिमारोह, १४७ पुत्रवती इत्यादी रोपे लावणेत आली आहेत. तसेच प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरासमोर आणि परसबागेत आंबा, नारळ, शेवगा, पेरू, पपई, चिकू इ. ३५०० रोपांची तसेच फुलझाडांची व फळझाडांची लागवड केली आहे.

**२) कुऱ्हाडबंदी :**

ग्रामीण भागात इंधनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड नेहमी होत असे. त्यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होते. त्याचे गंभीर परिणाम सर्वांवर होत असतात. शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील लोकांनी अभियानकाळात वृक्षतोड बंदी व कुऱ्हाडबंदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

**३) प्लॅस्टिक बंदी :**

पर्यांवरणाचा सर्वात मोठा शत्रू म्हणून आज प्लॅस्टिककडे पाहिले जाते. या प्लॅस्टिकमुळे अस्वच्छता निर्माण होते. तसेच त्याच्या अविनाशी तत्वामुळे ते नष्टही करता येत नाही. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळणे हे पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक आहे. हे ओळखून शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावात प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. दोन्ही गावात प्लॅस्टिक बंदी १०० टक्के झाली आहे.

**४) शौचालयांची उपलब्धता व वापर :**

शेळकेवाडीत सर्वच कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये आहेत. अभियान राबविण्यापूर्वी गावातील लोक सर्रास उघड्यावर शौचविधी करत असत. त्यामुळे अनेक प्रकारच्या रोगराईना सहज आमंत्रण मिळत असे. सर्वसाधारणपणे ८० टक्के आजार अशा गोष्टीमुळे होतात. ग्रामस्वच्छता अभियानात शौचालये बांधण्यावर व वापरावर अधिक भर देण्यात आल्याने ग्रामीण पर्यावरणावर अनुकूल प्रभाव झाल्याचे दिसते.

कोरेगावात ९६ टक्के उत्तरदात्यांच्या घरी वैयक्तिक शौचालये आहेत. उर्वरित लोक सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. तसेच अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक हायस्कूल येथै शौचालये व मुतारींची सोय आहे. त्यामुळे गाव १०० टक्के हागणदारी मुक्त बनले आहे.

## ५) बायोगॅस / गोबर गॅस :

पर्यावरण संवर्धनासाठी अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर अधिकाधिक आवश्यक आहे. तसेच इंधनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होते. त्यामुळे ग्रामीण भागात बायोगॅस/ गोबरगॅस घेणे अत्यावश्यक बनले आहे. खेडेगावात सेप्टिक टँक पद्धतीचे शौचालय बांधण्याऐवजी शोषखड्ड्यांचा संडास बांधावा किंवा ज्यांची ऐपत असेल त्यांनी गोबर गॅस बांधावे. सेप्टिक टँक शौचालयातून बाहेर पडणारा "वायू' पर्यावरणास घातक आहे. तसेच सेफ्टिक टँकचे दोन्ही आऊटलेट डास तयार करण्याचे कारखाने आहेत. तेव्हा शोषखड्ड्यांचा संडास किंवा गोबर गॅस उत्तम पर्याय ठरतो. बायेगॅस प्लँटमुळे स्वयंपाकासाठीच्या गॅसची गरजही भागते आणि शेतीला उत्तम खतही मिळते.

शेळकेवाडी या गावात एकूण ६५ कुटुंबे असून वैयक्तिक शौचालयांची संख्या ६८ आहे. बायोगॅसची संख्या ६८ असून त्याला शौचालये जोडली आहेत. गोबर गॅसचा उपयोग स्वयंपाक तयार करण्यासाठी इंधन म्हणून केला जातो.

कोरेगाव या गावात ८४० कुटुंबे असून त्यापैकी ८१२ घरात शौचालये आहेत. गावातील एकूण ४५२ गोबरगॅससाठी शौचालये जोडण्यात आली आहेत. गोबर गॅसचा उपयोग स्वयंपाकासाठी इंधन तसेच सोन खतासाठी होतो.

## ६) निर्धुर चुली :

घरात वापरले जाणारे इंधन जर कोळसा, लाकूड, गोवऱ्या, रॉकेल अशा स्वरुपाचे असेल तर धूर निर्माण होतो. त्या धुरापासून डोळे, श्वासनलिका याचा दाह होतो. शिवाय डोळ्यांचे विकार, दृष्टी अधू होणे, फुफ्फुस कमकुवत होणे असे घातक परिणाम होतात. तसेच पर्यावरण दूषित होते.

शेळकेवाडी या गावात १०० टक्के घरात बायोगॅसचा वापर केलेला आहे. काही कुटुंबाकडे गॅस सिलेंडर व निर्धुर चुली आहेत.

कोरंगावात ४५२ कुटुंबाकडे बायोगॅस आहेत. उर्वरित लोकांच्या घरी गॅस सिलेंडर व निर्धुर चुली आहेत. ज्यांच्याकडे गॅस नाही किंवा गॅस अपुरा आहे असे लोक निर्धुर चुलींचा वापर करतात.

## ७) सौरऊर्जा :

शेळकेवाडी या गावात ५ सौरदिवे बसविलेले आहेत. कोरेगावात २० सौरदिवे बसविलेले आहेत. ७ कुटुंबांकडे सौरप्रकाशाची सोय आहे. १० कुटुंबाकडे सोलर वॉटर हिटर बसविलेले आहेत. गावात अक्षय प्रकाश योजना असल्याने विजेची बचत मोठ्या प्रमाणात होते. अशा प्रकारे ग्रामीण पर्यावरणाचे होणारे नुकसान अभियान राबविल्यामुळे टाळता येणे शक्य होत आहे.

**सारांश :**

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान ही ग्रामीण भागातील परिवर्तनाची चळवळ आहे असे म्हणता येईल. हे अभियान इतर योजनांप्रमाणे एक शासकीय कार्यक्रम नाही. मोठ्या प्रमाणावरील लोक सहभाग हे या अभियानाचे एक वैशिष्ट्य आहे. शासनाने आखलेल्या इतर कोणत्याही योजनेपेक्षा कितीतरी अधिक प्रमाणातील लोक सहभाग या अभियानाला लाभला आहे असे दिसून येते. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे या अभियानामुळे ग्रामीण स्त्रियांना सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी अभियानाने मिळवून दिली आहे. पाणी-पुरवठा, घरांची स्वच्छता, शौचालयांचे बांधकाम, महिला बचत गटामार्फत महिलांचा आर्थिक विकास, माता आणि मुले यांचे आरोग्य शिक्षण अशा अनेक बाबींमुळे ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवर चांगला प्रभाव पडला असल्याचे दोन गावांच्या अभ्यासावरून दिसून आले आहे. शिवाय प्रस्तुत अभियानाच्या नावाप्रमाणे "स्वच्छता' या घटकाला अभियानात महत्त्व असल्याने पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाचे अनेक कार्यक्रम अभियानांतर्गत राबविले जात आहेत. त्यामुळे सदर अभियान महाराष्ट्रातील सर्व गावानी राबविल्यास ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होण्यासाठी आणि ग्रामीण जीवन आरोग्यसंपन्न बनण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग होईल.

संदर्भ


१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत कोरेगाव, ता. वाळवा, जि. सांगली

२. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर